**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक ११ | बुधवार, दि.१८ ते २४ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# देसाईगंज नगर परिषदेने वापरला जिल्हाधिकारी यांचा अधिकार

## विभागीय सहआयुक्त यांनी दिले चौकशीचे निर्देश: नियमबाह्य ठरावाची केली अंमलबजावणी

**गडचिरोली:-** नगर परिषद देसाईगंज येथील १७३ भाडेपट्टीवर देण्यात येणाग्रा भाडेप?ट्टयाचे नुतनीकरण करारनामा करण्याची मुदत सन २०११ मध्येच संपलेली असून करारनामा संपुष्टात आल्यानंतर तब्बल १४ वर्षानंतर भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण, शर्तभंग नियामानुकुल संदर्भात महाराष्ट्र शागनाच्या नगर विकास विभागाने दि.२५/३/२०११ ला जारी केलेल्या अधिसूचनेनुसार संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना बहाल केले आहे. त्यामुळे, दि.२१/५/२०२५ ला देसाईगंज येथील प्रशासकीय सभा ठराव क्र.४४६/२०२५ अन्यये घेत-लेला ठराव हा नियमबाह्य व बेकायदेशीर ठरत असल्याने आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन अधिकाराचा गैरवापर करून एकूण रुपये ७२.४० लक्ष रुपयाच्या अवैद्य वसुलीबाबत तसेच नियमबाह्य ठरावात सहभागी असलेल्या संबंधीतांबर नागरी सेवा (शिस्त व अपील) मधील तरतुदीनुसार कठोरात कठोर कारवाई करून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत विभागीय सह आयुक्त रवींद्र भेलावे यांनी दि.५/२/२०२६ ला निर्देश दिल्याने पालिका क्षेत्रात खळबळ माजली आहे.



महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण, शर्तभंग नियामानुकुल करण्यासाठी जारी केलेल्या दि.२५/३/२०११ ला केलेल्या अधिसूचनेत भाडेपट्टयाचे नुतनीकरण मूळ भाडेपट्टयातील अटी शर्तीवर करण्यात येईल, नुतनीकरणानंतर भाडेपट्टयाचे दर हे महाराष्ट्र नगरपरिषद (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम १९८३ मधिल नियम ९(२) अन्वये स्थापित त्रिसदस्यीय समितीने निश्चित केल्याप्रमाणे असतील, भाडेप?ट्टयाखालील जमिनीच्या वापरात नुतनीकरणाच्या वेळी शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही, प्रत्येक भाडेपट्टयाचे नुतनीकरण हे मूळ भाडेपट्टयाच्या कालावधी किंवा ३० वर्षे यापेक्षा जे कमी असेल तेवढ्याच कालावधीसाठी करता येईल, शर्तभंग आढळल्यास, भाडेपट्टा नुतनीकरणासाठी शासनाची पूर्वानुमती आवश्यक राहील, जिल्हाधिकारी यांनी ङ्गवङ्ग व ङ्गकङ्ग च्या नगर परिषदां च्या स्थावर मालमत्तेचे भाडेप?ट्टयाच्या नुतनीकरणासंदर्भात घेतलेल्या कोणत्याही निर्णयावर पुनरिक्षण करण्याचे अधिकार शासन स्वतः जवळ राखून ठेवले असल्याच्या एकूण ६ अटीवर जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान केल्या आहे.

देसाईगंज नगर परिषद ही मकफ वर्गाच्या च्या नगर परिषदांमध्ये मोडत असून महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण, शर्तभंग नियामानुकुल करण्यासाठी जारी केलेल्या दि.२५/३/२०११ च्या अधिसूचनेनुसार नगर परिषद देसाईगंज येथील प्रशासकीय सभा ठराव क्र.४४६/२०२५ दि.२१/५/२०२५ अन्वये देसाईगंज नगर परिषद गाळा सुसूत्रीकरण व हस्तांतरण अभियान २०२५ राबविणबाबत ठराव घेताच येत नसून प्रशासक यांना मुळीच अधिकार नसताना नगर परिषद देसाईगंज येथील एकूण १७३ भाडेपट्टीवर देण्यात येणाग्रा भाडेप?ट्टयाचे नुतनीकरण करारनामा करण्याची मुदत सन २०११ मध्येच संपलेली असल्याने जवळपास चौदा वर्षाचा कालावधी उलटलेला आहे. नव्याने भाडेपट्टा करारनामा करताना दि.२५/३/२०११ च्या अधिसूचनेनुसार भाडेपट्टयाचे नुतनीकरण मूळ भाडेपट्टयातील अटी शर्तीवर करण्यात येईल, नुतनीकरणानंतर भाडेपट्टयाचे दर हे महाराष्ट्र नगरपरिषद (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम १९८३ मधिल नियम ९(२) अन्वये स्थापित त्रिसदस्यीय समितीने निश्चित केल्याप्रमाणे भाडेवाढ करणे बंधकारक असताना याचेही उल्लंघन करून सरसकट दरवर्षी १०% भाडेवाढ मनमानी व नियमबाह्यरित्या केले आहे.

> **जिल्हाधिकारी यांना बहाल केले असतांना नियमबाह्य व बेकायदेशीररित्या दि.२१/५/२०२५ ला प्रशासकीय सभा ठराव क्र.४४६/२०२५ अन्वये ठराव घेऊन अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन एकूण रुपये ७२.४० लक्ष केलेल्या अवैद्य वसुलीचे सखोल अंकेक्षण करण्याचे निर्देश सहायक संचालक गडचिरोली यांना दि. १६/१/२०२६ ला दिले आहेत**
>
> **गौरी ठाकूर, सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने भाडेपट्टा नुतनीकरण, हस्तांतरण, शर्तभंग नियामानुकुल करण्यासाठी जारी केलेल्या दि.२५/३/२०११ च्या अधिसूचनेनुसार शर्तभंग आढळल्यास, भाडेपट्टा नुतनीकरणासाठी शासनाची पूर्वानुमती आवश्यक राहील असा स्पष्ट उल्लेख आहे.

ठरावात एकूण ५६ भाडेपट्टीवर देण्यात आलेल्या या मालमत्ता नियामानुकुल करण्यासाठी शासनाकडे पूर्वानुमतीसाठी पाठविणे बंधनकारक होते, शिवाय हस्तांतरण फीबाबत अधिसूचनेत कुठेही तरतूद केली नसताना पालिकेने मनमानी करून आधी रु.१,०००००/- नंतर लगेच दि.२८/५/२०२५ ला पुन्हा प्रत्येकी रु.६०,०००/- तर काहींकडून रु.४०,०००/- मनमानी व नियमबाह्य वसुली करून थेट शासनाच्या अधिकारावरच गदा आणली असल्याचे उघडकीस आल्याने संबंधिताचे धाबे दणाणले आहेत.

# राज्यात ७५ शाळांना अल्पसंख्यांक प्रमाणपत्र वाटप प्रकरणात मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती

**मुंबई-**राज्यात ७५ शाळांना अल्पसंख्यांक प्रमाणपत्र वाटप प्रकरणात मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती देण्यात आली आहे.अजित दादांच्या निधनादिवशीच मंत्रालयात फाईलवर सह्या करण्यात आल्या होत्या. याप्रकरणात राज्यभरातून संताप व्यक्त होताच मुख्यमंत्र्यांकडून ७५ शाळांच्या अल्पसंख्यांक प्रमाणपत्रांना स्थगिती दिली आहे. अजितदादांच्या निधनाच्या दिवशी राज्यातील अल्पसंख्याक विकास विभागाने ७५ शाळांना परस्परपणे अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र वाटप केल्याप्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. मात्र, अजित दादांच्या अपघाती निधनादिवशीच मंत्रालयात अत्यंत लाजीरवाणी घटना घडल्याचे प्रकरण समोर आले आहे.

अजित दादांनी थांबवून ठेवलेल्या काही फाईल्सवर सुमारे ४ वाजताच्या सुमारास सह्या करण्यात आल्याचे प्रकरण उघडकीस आलं होते. आता, याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. तसेच, संबंधित प्रमाणपत्रास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून स्थगिती देण्यात आली. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी उच्चस्तरीय अधिर्कायाकडून करा आणि दोषींवर कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य सरकारने ३ दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला होता. राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून ४ दिवसांत राज्यातील ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणावरुन विरोधकांनी राज्यातील सरकारवर जोरदार टीका केली आहे. तर, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही तीव्र संताप व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. हे नेमकं कोणाच्या इशाऱ्यावर केले आहे? याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत की अजून कोणी आहे? हे महाराष्ट्राला कळले पाहिजे. अजितदादा निडर व्यक्तिमत्त्व होते, प्रशासनावर त्यांची मजबूत पकड होती. त्यांच्या निधनातून सावरण्याआधीच असे कृत्य झाले असेल, तर याची संपूर्ण जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारली पाहिजे. याप्रकरणात दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे या घटनेचा आणि राज्यातील सरकारचा आम्ही निषेध व्यक्त करतो, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

मागील वर्षी ऑगस्ट २०२५ पासून अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती होती. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांतच मंत्रालयातून गुपचूपपणे प्रमाणपत्रांचे वाटप सुरू झाल्याचे पाहायला मिळाले आहे. २८ जानेवारी रोजी अजित पवारांच्या अपघाताच्या दिवशीच पहिले प्रमाणपत्र देण्यात आले होते. या प्रकरणावरून आता राज्यातील सरकारवर विरोधी पक्षांनी जोरदार टीका केली आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून राज्यातील ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर अवघ्या काही तासांतच ही प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात झाल्याचे उघड झाले आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती देण्यात आली होती. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर ही स्थगिती डावलून मंत्रालयातून गुपचूपपणे प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.

पहिले प्रमाणपत्र २८ जानेवारी २०२६ रोजी अजित पवार यांच्या अपघाताच्या दिवशीच देण्यात आले आहे. राज्यात शासकीय दुखवटा सुरू असताना मंत्रालयात, ही प्रक्रिया कशी आणि कोणाच्या आदेशाने राबवली गेली, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. याप्रकरणात ४ दिवसांत ७५ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. मंत्री माणिकराव कोकाटे, दत्तात्रय भरणे आणि अजित पवार यांनी यापूर्वी ही प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती दिली होती.

मात्र, त्यांच्या निधनानंतर अचानक ही प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचा आरोप होत आहे. अजित पवारांच्या निधनानंतर घाईघाईने प्रमाणपत्रे देण्यात आल्याने, यामागे मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी केला आहे.

अल्पसंख्याक विभागातील या गैरकारभाराविरोधात त्यांनी उघडपणे आवाज उठवला आहे. या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारेखान यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. राज्यातील ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचा प्रकार अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर चौकशी करून मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. राज्यात अल्पसंख्यांक दर्जा देण्याची प्रक्रिया सध्या पैसे कमावण्याचा अड्डा बनली आहे, असा गंभीर आरोप करत प्यारेखान यांनी राज्यातील ८,५०० हून अधिक अल्पसंख्यांक शाळांची सखोल चौकशी करण्यात येणार आहे अशी माहिती दिली आहे.

# मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून गोंदियात "नीव' प्रकल्पासाठी जिल्हाधिकारींच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**गोंदिया:** गोंदिया जिल्हा प्रशासन आणि "प्रधान' संस्था यांच्यामध्ये पाच वर्षांच्या "नीव' (NEEV-Nurturing Equitable Emowerment & Livelihoods in Vidarbha) प्रकल्प (२०२५-२०३०) अंमलबजावणीसाठी सामंजस्य करार (चेण) करण्यात आला आहे. हा प्रकल्प टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाच्या विकसित विदर्भ संकल्पनेशी सुसंगत असा हा प्रकल्प आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी प्रजित नायर व प्रधान संस्थेचे कार्यकारी संचालक सरोज महापात्रा यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. याप्रसंगी डॉ. हर्षा वशिष्ठ, कुंतल मुखर्जी आणि दिगंबर चौधरी उपस्थित होते.

या प्रकल्पांतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ८००० ग्रामीण व आदिवासी कुटुंबांना थेट लाभ मिळणार असून, हा एकूण प्रकल्प उद्दिष्टांचा निम्मा हिस्सा आहे. प्रकल्पाद्वारे पुनरुत्पादक शेती पद्धती, जलसंधारण व जलस्रोत विकास, वनआधारित उपजीविका, पशुपालन व मत्स्य व्यवसाय वृद्धी, महिलांच्या नेतृत्वाखालील संस्थांचे बळकटीकरण तसेच ग्रामपंचायत नियोजन प्रक्रियेचे सुदृढीकरण यावर विशेष भर दिला जाणार आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेती आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याचा या प्रकल्पाचा हेतू आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावर नियोजन प्रणाली मजबूत करून स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अधिक प्रभावी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

हा प्रकल्प पुढील पाच वर्षांत गोंदिया जिल्ह्यात शाश्वत उपजीविका, मजबूत करणे स्थानिक स्वराज्य संस्था आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास साध्य करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

# प्रत्येक रुग्णालयात आता 'पॅलिएटीव्ह केअर'सेवा; जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गोल्हार

**गोंदिया:**राज्यात कर्करोग, हृदयरोग, मधुमेह आणि वृद्धत्वाशी संबंधित आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. अशा गंभीर आजारांशी झुंजणाऱ्या रुग्णांना केवळ उपचारांचीच नव्हे, तर मानसिक आधार आणि वेदनामुक्तीची नितांत गरज असते. हीच गरज ओळखून आता जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात 'पॅलिएटीव्ह केअर' (पशामक उपचार) सेवा बंधनकारक करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी दिली.

डॉ. गोल्हार यांनी सांगितले की, "अनेकदा रुग्ण वेदना आणि मानसिक तणावात जीवन जगत असतात. 'रुग्ण वाचला पाहिजे' या संकुचित दृष्किोनापलीकडे जाऊन, रुग्णाला सन्मानाने आणि वेदनामुक्त जगता आले पाहिजे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे." ही योजना दुर्लक्षित आणि गरजू रुग्णांसाठी शासनाची एक मोठी हमी ठरणार आहे.

**सेवेची प्रमुख वैशिष्ट्ये:**

सर्व स्तरावर उपलब्धता: ही सेवा केवळ जिल्हा रुग्णालयातच नव्हे, तर उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे (झकउ) आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांवरही उपलब्ध असेल.

**खाटांचे आरक्षण:** जिल्हा रुग्णालयांमध्ये या सेवेसाठी किमान ४ ते ६ खाटा राखीव ठेवण्यात येतील. कोणत्याही गरजू रुग्णाला 'बेड नाही' असे म्हणून नाकारता येणार नाही.

**औषधांची उपलब्धता:** सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे, मॉर्फिनसारखी प्रभावी वेदनाशामक औषधे आता थेट प्राथमिक आरोग्य केंद्रांवर उपलब्ध करून दिली जाणार आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना आता या औषधांसाठी जिल्हा रुग्णालयात फेऱ्या मारण्याची गरज उरणार नाही.

**बहुआयामी उपचार:** यात २४ तास नर्सिंग केअर, समुपदेशन, फिजिओथेरपी आणि गरजेनुसार गृहभेटीचाही समावेश असेल.

केवळ 'शेवटच्या क्षणाची' सेवा नाही

पॅलिएटीव्ह केअरबाबत असलेला संभ्रम दूर करताना डॉ. गोल्हार म्हणाले की, ही सेवा केवळ आयुष्याच्या शेवटच्या क्षणापुरती मर्यादित नाही. आजाराचे निदान झाल्यापासून ते उपचारांच्या संपूर्ण प्रवासात रुग्णाला शारीरिक वेदना नियंत्रण, मानसिक-सामाजिक आधार आणि कौटुंबिक समुपदेशन देणारी ही एक प्रभावी वैद्यकीय व्यवस्था आहे.

प्रशासनाने स्पष्ट संदेश दिला आहे की, "उपचार झाले, पण वेदना आमच्या जबाबदारीबाहेर आहेत," असे आता कोणत्याही रुग्णालयाला सांगता येणार नाही. या सेवेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अभिजीत गोल्हार यांनी केले आहे.

# शेतजमिनीचा निवासी व व्यावसायिक,औद्योगिक वापर करण्यासाठी एनए परवानगीची अट रद्द

**मुंबई-**शेतजमिनीचा निवासी व व्यावसायिक औद्योगिक वापर करण्यासाठी एन ए परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. राज्य शासनाने शेतजमिनीचा निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापर करण्यासाठी आवश्यक असलेली ना परवानगीची अट रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे बांधकाम व्यावसायिक, गृहनिर्माण संस्था आणि जमीनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील नव्या नियमानुसार विकास आराखड्याशी सुसंगत असलेल्या जमिनींसाठी स्थानिक नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच अकृषिक परवानगी म्हणून ग्राह्य धरली जाणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र मंजुरी घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

याशिवाय वार्षिक बिनशेती कराची अटही रद्द करण्यात आली आहे. राज्यात घर किंवा इमारत उभारण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका किंवा नगररचना विभागाकडून अधिकृत बांधकाम नकाशा मंजुरी घेणे बंधनकारक राहणार आहे. तर राज्यातील संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागणार आहे. राज्यात बांधकाम मंजुरीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. अर्ज सादर झाल्यानंतर महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे सातबारा उताऱ्यात नोंद होणार आहे. राज्यात फक्त बांधकाम परवानगी मिळाल्यामुळे भोगवटादार वर्ग दोनमध्ये आपोआप बदल होणार नाही. तर ७/१२ उताऱ्यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाईल, त्यासाठी आवश्यक शुल्क स्वतंत्रपणे भरावे लागणार आहे.

अर्जानंतर छाननी शुल्कही ऑनलाईन भरावे लागणार आहे. राज्यातील नोंदणीकृत नियमानुसार नकाशा तयार करून तो अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करतात. त्यानंतर नगररचना विभागाकडून तांत्रिक पडताळणी केली जाते. सर्व अटी पूर्ण झाल्यास डिजिटल स्वाक्षरीसह मंजुरी प्रमाणपत्र दिले जाते. यासाठी सातबारा उतारा किंवा मालमत्ता पत्रिका, भूमी अभिलेख विभागाचा मोजणी नकाशा, नोंदणीकृत वास्तुविशारद परवान्याची प्रत, चालू वर्षाचा घरपट्टी किंवा मालमत्ता कर भरल्याची पावती, अग्निशमन, पर्यावरण विभाग, विमानतळ प्राधिकरण यांसारख्या संबंधित यंत्रणांची ना हरकत प्रमाणपत्रे ही कागदपत्रे जमा करावी लागणार आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे बांधकाम परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करणे अनिवार्य राहणार आहे, असे राज्यातील महसूल प्रशासनाने म्हटले आहे.

# पाच वर्षांत रोखले १८ बालविवाह

**गोंदिया:** - महिला व बालविकास विभागाची सातत्यपूर्ण जनजागृती व कठोर अंमलबजावणीमुळे गेल्या पाच वर्षांत १८ बालविवाह थांबविण्यात यश आले आहे. त्यामुळे अनेक अल्पवयीन मुलींचे शिक्षण, आरोग्य व भवितव्य सुरक्षित झाले आहे.

बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ वर्षापेक्षा कमी असल्यास विवाह हा गुन्हा ठरतो. तरीही सामाजिक दवाब, अज्ञान व परंपरेच्या नावाखाली काही ठिकाणी बालविवाहाचे प्रकार समोर येत होते.

ती रोखण्यासाठी गंभीर दखल घेत महिला व बालविकास विभागाने प्रतिबंध अधिकारी, अंगणवाडीसेविका, आशा कार्यकर्त्या, पोलिस प्रशासन व स्थानिक संस्थांच्या समन्वयातून तातडीने पावले उचलली.गोपनीय माहितीच्या आधारे अनेक ठिकाणी अचानक भेट देत विवाह थांबवण्यात आले.

### होऊ शकतो दंड किंवा सक्तमजुरी

विवाह समारंभात बाल विवाह होणार नाही, याकरिता प्रत्येक सुजाण नागरिकाने याची खबरदारी घेतली पाहिजे. १८ वर्षाच्या आत मुलीचे लग्न व २ २१ वर्षाच्या आत मुलाचे लग्न लावणे कायद्याने गुन्हा आहे. बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असून, बालकांशी विवाह करणाऱ्याला व करून देणाऱ्याला दोन वर्षांपर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही होऊ शकते, अशी कायद्यात तरतूद आहे, असे संरक्षण अधिकारी रवींद्र टेंभुर्णे यांनी सांगितले.

### गाव कर्मचारीच प्रतिबंधित अधिकारी



३ जून २०१३ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार, तसेच बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ (२००७ चा ६) कलम १६ चे पोट कलमे (१) व (३) नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) आणि प्रकल्पांतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका व ग्रामपंचायत स्तरावर संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे बालविवाह रोखणे आणि बाल हक्कांचे संरक्षणासाठी अधिक सक्षमपणे प्रयत्न करतील, अशी अपेक्षा आहे.

### रोखण्यात आलेले बालविवाह वर्षनिहाय

| सन | बालविवाह रोखले |
|---|---|
| २०२२ | ०२ |
| २०२३ | ०३ |
| २०२४ | ०२ |
| २०२५ | ०९ |
| २०२६ | ०२ |

### काय आहेत कारणे

**बालविवाह प्रथा, स्त्रियांना आजही निम्न दर्जा असणे, कुटुंबातील आर्थिक समस्या, चूल आणि मूल ही संकल्पना, धार्मिक संकल्पना, शिक्षणाचा अभाव, बालविवाहाचे दुष्परिणाम माहिती नसणे आदी कारणांमुळे बालविवाह होत आहेत.**

### एफआयआर होण्याची पाळी आली नाही

**मागील पाच वर्षांत जिल्हा बालसंरक्षण कक्षाच्या पथकाने जिल्हाभरात राबविलेल्या मोहिमेत दोन्ही पक्षांना कायद्याचे ज्ञान देऊन बालविवाह थांबविण्यात आले आहेत. गुन्हे दाखल करण्याची पाळी येऊ नये यासाठी जोरदार जनजागृती करण्यात आली. बालविवाहास प्रतिबंध घालण्याचा ठाम संदेश समाजात गेला आहे. यासोबतच शाळा, महिला मेळावे व समुपदेशन कार्यक्रमांद्वारे बालविवाहाचे दुष्परिणाम, कायदे व मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी बालविवाहाची माहिती मिळाल्यास तत्काळ चाइल्ड हेल्पलाइन १०९८ किंवा महिला व बालविकास विभागाशी संपर्क साधावा. आपल्या परिसरात कोठे बालविवाह होत असेल, तर चाइल्ड लाइनच्या टोल फ्री १०९८ क्रमांकावर माहिती देता येते. शिवाय महिला व बालविकास विभागाचे कार्यालय, पोलिस प्रशासनाला माहिती देऊनही बालविवाह रोखता येतो. माहिती देणाऱ्यांचे नाव प्रशासनाकडून गुप्त ठेवले जाते.**

**- रेशमा मोरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, गोंदिया**

**बालविवाह करणे कायद्यानुसार गुन्हा आहे. बालविवाहामुळे मुला-मुलींच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे बालविवाह होऊ नये, यासाठी प्रबोधन करण्यासह कारवाईही प्रशासनाकडून केली जात आहे. पालकांनीही आपल्या अल्पवयीन मुला-मुलींचा विवाह करू नये. बालविवाह होत असेल, तर प्रशासनाला माहिती द्यावी.**

**- गजानन गोबाडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, गोंदिया**

# जिल्ह्यात ६६० लोकांमागे एक पोलिस!

**गोंदिया :-** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडत चालली आहे; परंतु ती अबाधित ठेवण्यासाठी पुरेसे मनुष्यबळच पोलिस दलाकडे नसल्याचे समोर आले आहे. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला पोलिसांची संख्या तेवढीच आहे. सद्यस्थितीत गोंदिया पोलिसांकडे दोन हजार मनुष्यबळ आहे. त्यांच्यावरच १३ लाख २२ हजार लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे. त्यामुळे सरासरी ६६० लोकांमागे एक पोलिस कर्मचारी असल्याचे दिसते. मनुष्यबळ कमी असल्यास कसे होईल रक्षण? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हा नक्षलग्रस्त व अत्यंत संवेदनशील असल्याने नक्षल बंदोबस्ताबरोबर इतर बंदोबस्त, विविध गुन्ह्यांचा तपास यामुळे पोलिस कर्मचारी तणावात राहतात. त्यातून पोलिस कर्मचारी आत्महत्येचे पाऊल उचलतात. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना त्यांच्या सुरक्षेसाठी मात्र मनुष्यबळ अपुरे पडत आहे. २०११ च्या जनगणनेनुसारच पोलिस बळ देण्यात आलेले होते; परंतु त्यानंतर आता लोकसंख्येत झपाट्याने वाढ होऊन १३ लाख २० हजाराच्या घरात पोहोचली. परंतु तरीही मनुष्यबळ वाढलेले नाही. त्यामुळे एका पोलिसावर सरासरी ६६० लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी आली आहे. हा आकडा पाहता सामान्यांची सुरक्षा कशी होईल? असा प्रश्न आहे. त्यामुळे गोंदिया नव्हे तर राज्यात पोलिसबळ वाढविण्याची मागणी होत आहे.

| | पदे मंजूर | कार्यरत |
|---|---|---|
| पोलिस अधीक्षक | ०१ | ०१ |
| अपर पोलिस अधीक्षक | ०१ | ०१ |
| उपविभागीय पो.अधि. | ०६ | ०४ |
| पोलिस निरीक्षक | २२ | २१ |
| एपीआय | ४८ | ३९ |
| पीएसआय | ७० | ६२ |
| कर्मचारी | २३१० | ३१० |



### सण, उत्सवातही कुटुंबासोबत नाही

**ऊन, वारा, पाऊस व थंडीची याची तमा न बाळगता आणि कोणताही सण-उत्सव असला तरी पोलिस बांधव-भगिनी आपल्या कुटुंबापासून दूर राहून बंदोबस्त करतात. अनेकदा बाहेर राज्यातही प्रवास करावा लागतो. त्यातच निवडणूक इतर बंदोबस्त काळात सुट्टीही भेटत नाही. त्यामुळे पोलिस अधिकारी-कर्मचारी तणावात असतात.**

### १३,२२,५०७ जिल्ह्याची लोकसंख्या

**१६ पोलिस ठाणे,०८ तालुका राजा बदलतो, सेना तीच जिल्ह्यात अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्यावरच १३.२२ लाख लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे; परंतु कशाचीही तमा न बाळगता पोलिस बांधव २४ तास जनतेच्या रक्षणासाठी तत्पर असतात. जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक बदलतात परंतु कर्मचारी तेच असतात. जिल्ह्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सांभाळण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कामाची पध्दत वेगवेगळी असते.**

दरम्यान, शासनस्तरावरून केवळ गोंदियाच नव्हे, तर राज्यभरातील लोकसंख्येनुसार प्रत्येक जिल्ह्यात मनुष्यबळ वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असा सूर निघत आहे.

# ७५ वर्षांची प्रतीक्षा संपली; ५०० सिंधी कुटुंबे होणार भूमालक

**गोंदिया:-** वर्ष १९४७ मध्ये देशाची फाळणी झालेल्या विस्थापित झालेल्या शहरातील सिंधी समाजबांधवांना गेल्या ७५ वर्षापासून जमिनीचे मालकी हक्क पट्टे मिळाले नव्हते. असे शहरात ५०० हून अधिक कुटुंब होते. याचीच दखल घेत आ. विनोद अग्रवाल यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पत्रव्यवहार व पाठपुरावा केला होता. महसूलमंत्र्यांनी गोंदिया शहरातील ५०० हून अधिक कुटुंबांना जमिनीचे मालकी हक्क पट्टे देण्याचे निर्देश संबंधित विभागाला शुक्रवारी दिले.

आ. विनोद अग्रवाल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी करून सिंधी समाजबांधवांना जमिनीच्या पट्ट्यांचा हक्क देण्याची विनंती केली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानुसार सिंधी समाजाला जमीन पट्टे देण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात आली. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी



## शहरी व ग्रामीण भागाचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**गोंदिया शहर व ग्रामीण भागात अनेक वर्षापासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमणधारकांनाही (वनजमीन वगळून) जमीन वाटप करून मालकी हक्क देण्याचे काम सुरू आहे. यासाठीचे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असून लवकरच त्यांनाही त्यांचा हक्क मिळणार आहे.**

**हजारो सिंधी कुटुंब जमिनीच्या मालकी हक्क पट्ट्यांसाठी लढा देत होते. टँक पार्क परिसरातील ११० दुकाने, तसेच एकूण ५०० घरांना आता मोफत मालकी हक्क मिळणार आहे. मग ते नझूल जमिनीवर किंवा कोणत्याही शासकीय जमिनीवर अतिक्रमणधारक असोत.**

**- विनोद अग्रवाल, आमदार**

आ. विनोद अग्रवाल यांनी उपस्थित केलेल्या सिंधी समाजाच्या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करून जमीन वाटपाचा प्रश्न सोडवून मालकी हक्क देण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे ७५ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याने सिंधी समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# गोशाळांचे अनुदान थकले, दानही मिळेना; कसे जगवायचे गोधन ?

### गोंदियात केवळ तीनच गोशाळा : सुटका केलेल्या जनावरांनाही ठेवले जाते गोशाळेत



**गोंदिया:-** जिल्ह्यातील गोशाळांना शासनाकडून मिळणारे अनुदान सहा महिन्यांपासून रखडले असून, त्याचा थेट परिणाम गोधनाच्या पालनपोषणावर होत आहे. दुसरीकडे, शासकीय अनुदानामुळे पूर्वी गोशाळांना मदतीचा हात देणाऱ्या दात्यांची संख्याही घटली आहे. त्यातच वाढती महागाई, चारापाण्याचे दर आणि औषधोपचारांच्या वाढलेल्या खर्चामुळे गोशाळा चालवणे कठीण बनले आहे.

**गोंदिया जिल्ह्यात तीनच अनुदानित**

गोशाळा कार्यरत आहेत. गोंदिया जिल्ह्यात अनेक गो-शाळा आता सुरू केल्या आहेत. जनावरांना कत्तलीसाठी नेत असताना पोलिसांनी कारवाई केली तर ही सुटका केलेली जनावरे गोशाळेत ठेवली जातात. त्यांचाही खर्च गोशाळा चालकांना करावा लागतो. प्रत्येक गायीसाठी किमान २०० रुपये खर्च येतो. मात्र, शासनाकडून मिळणारे प्रति गाय दररोजचे ५० रुपये अनुदानही सहा महिन्यांपासून थकले आहे. त्यामुळे गोधनाला चारापाणी पुरवणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि गोशाळेतील कामकाज चालवणे या साऱ्यांवर मोठा आर्थिक ताण आला आहे. पूर्वी धार्मिक कारणास्तव व दान देत असत. मात्र, शासनाकडून अनुदान मिळत असल्याने आता दानदाते मागे हटले आहेत. सध्या अनुदान व दान दोन्ही ठप्प झाल्याने अनेक गोशाळा संकटात सापडल्या आहेत. मजुरांचे मानधन आणि चारापाणी देण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ आली आहे.

प्रति गाय- प्रति दिन ५० रुपये सरकारकडून एका गायीला प्रति दिन फक्त ५० रुपये अनुदान मिळते. परंतु, हे अनुदानही सहा महिन्यांपासून थकले आहे.

गायीचे अनुदानही थकीत गायींच्या देखभालीसाठी सरकारकडून एका गायीला प्रति दिन फक्त ५० रुपये अनुदान मिळते. मात्र, हे अनुदान मागील सहा महिन्यांपासून थकले आहे.

**१५० पेक्षा अधिक संख्या**

गोंदियातील गोशाळांत एकूण १५० पेक्षा अधिक गायी आहेत. या गायींसाठी रोजच्या चारापाण्याची व औषधोपचाराची मोठी जबाबदारी गोशाळा चालकांवर आहे. १५०० रुपये शासनाकडून एका गायीचा सांभाळ करण्यासाठी गोशाळा मालकांना प्रति महिना दिले जातात. प्रत्येकी दिवशी ५० रुपये देतात.

**शासनाकडून होते दुर्लक्ष**

अनेक ठिकाणी पावसामुळे चाराही दुर्मिळ झाला आहे. त्यात गेल्या सहा महिन्यांपासून थकलेल्या अनुदानामुळे आणि महागाईच्या कचाट्यात अडकलेल्या गोशाळांचे भवितव्य सध्या थोक्यात आले असून, गोधन वाचवण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

**चारापाण्याचा प्रश्न अवघड**

प्रत्येक गायीसाठी दररोज सुमारे २०० रुपये खर्च येतो, तर सरकारकडून फक्त ५० रुपये अनुदान आहे. त्यामुळे उर्वरित खर्च गोशाळांना स्वतः भागवावा लागत आहे.

**गायीचे वजन लक्षात घेता तिला दररोज १५ ते २० किलो आहार लागतो. गावात गायींना कुरण उप-लब्ध असते, पण शहरातील गायींचा चारा विकतच घ्यावा लागतो. तो ५० रुपयांमध्ये शक्य नाही. शिवाय गायीच्या आरोग्यावरही खर्च वाढला आहे. पहिल्यांदा सरकारने असा निर्णय घेतल्याने गोशाळा किंवा शेतकऱ्यांना एक आर्थिक सहाय्य मिळाले आहे. यातून देशी गायींचे संवर्धन होईल आणि संख्याही वाढेल.**

**- सुभाष आकरे, गोशाळा चालक, आमगाव**

**चारापाणीही झाले महाग**

सध्या गायीचे मिळणारे ५० रुपयांचे अनुदान थकले आहे, दान मिळत नाही, चारापाणी महाग झाले आहे. अशा स्थितीत गोधन कसे जगवायचे? हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे, असे भोकरदन तालुक्यातील एका गो-शाळा चालकाने सांगितले आहे.

**दान देणाऱ्यांची संख्या कमी**

अनुदानावर अवलंबून राहणाऱ्या गोशाळांना दानदात्यांचा मोठा आधार होता. मात्र, आता दानदात्यांची संख्या घटल्याने आर्थिक संकट तीव्र झाले आहे.

# सटवा/डव्वा येथे आमदारांच्या हस्ते पशुपक्षी प्रदर्शनीचे उद्घाटन



**गोरेगाव :-** तालुक्यातील साटवा/डव्वा पशुपक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते पशुपक्षी प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषदच्या सभापती दिपाताई चंद्रिकापुरे, डॉ. लक्ष्मण भगत, रजन-ीताई कुंभरे, पौर्णिमाताई ढेंगे, पंचायत समिती गोरेगावच्या सभापती चित्रकलाताई चौधरी, उपसभापती रामेश्वर महारवाडे, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद गोंदिया पंकज रहांगडाले, जिल्हा परिषद सदस्य प्रीतिताई कतलाम , जितेंद्र कटरे, मनोज बोपचे, राजकुमार यादव, किशोरकुमार पारधी, ओमप्रकाश कटरे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. जे. के.तीटमे, तसेच महेंद्र ठाकूर, ओमेंद्र ठाकूर, टीकाराम रहांगडाले, रवींद्र कटरे, अर्चना ठाकूर, विनोद पारधी, पुष्पराज जलबंधू, कविता कापगते, गट विकास अधिकारी पंचायत समिती गोरे-गावष्ट्च. व्ही. गौतमयांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पशुपालक व शेतकरी बांधवांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. पशुसंवर्धन विभागांतर्गत राष्ट्रीय पशुधन अभियान, पशुधन विकास योजना, दुग्धव्यवसाय प्रोत्साहन योजना, लसीकरण मोहीम, जनावरांचे विमा संरक्षण योजना तसेच शासकीय अनुदानाच्या योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञ अधिकाऱ्यांनी आधुनिक पशुपालन तंत्रज्ञान, दुग्धउत्पादन वाढविण्याचे उपाय, चारा व्यवस्थापन, गोठा व्यवस्थापन व आजार प्रतिबंध यावर माहिती दिली. प्रदर्शनात विविध जातींचे पशुपक्षी सादर करण्यात आले होते. उत्कृष्ट पशुपालन करणाऱ्या पशुपालकांना विविध बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पशुपालन हा महत्त्वाचा पूरक व्यवसाय असून, शासनाच्या योजनांचा लाभ घेतल्यास शेतकरी व युवकांना स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनाबद्दल सर्वांचे कौतुक करण्यात आले.

# सुंदरनगरमधून १.४६ लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त

**गोंदिया :-** जिल्ह्यात अंमली पदार्थांचे जाळे घट्ट होत आहे. यावर आळा घालण्यासाठी गोंदिया पोलिसांनी कंबर कसली असून शहरातील सुंदरनगर परिसरात एम.डी. (मेफेड्रोन) या घातक अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका आरोपीला जाळ्यात अडकविण्यात पोलिसांना यश आले आहे. आरोपीकडून १ लाख ४६ हजार २०० रुपये किमतीचा ७.३१० ग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. तौसिफ उर्फ पिरू मुस्ताक शेख (२४) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली.

शहरासह जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्रीला ऊत आले आहे. तस्करीतून सुरू असलेल्या प्रकारावर आळा घा-लून अंमली पदार्थ विक्रीचे जाळे खोदून काढण्यासाठी गोंदिया पोलिसांनी कंबर कसली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रविवारी (ता.१५) जिल्ह्यात गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, सुंदरनगर परिसरात एक तरुण स्वतः जवळ एम.डी. पावडर बाळगून त्याची विक्री करण्यासाठी फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीची खात्री पटताच, जिल्हा पोलिस अधिक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या नेतृत्वात पोलिसांनी सुंदरनगर भागात सापळा रचला. दरम्यान संशयास्पद स्थितीत फिरणाऱ्या तौसिफ उर्फ पिरूला पोलिसांनी त्याच्या घरासमोरील रोडवर ताब्यात घेतले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या खिशात दोन पारदर्शक प्लास्टिक झिप्पर पाऊच आढळले. या पाऊचमध्ये पांढ?या रंगाचा एम.डी. हा अंमली पदार्थ असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी ७.३१० ग्रॅम एमडी साठा जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले.

याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक धीरज राजूरकर यांच्या तक्रारीवरून गोंदिया शहर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्याच्या कलम ८ (क) व २२ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर, सपोनि धीरज राजूरकर, राजू मिश्रा, संजय चौहान, सुजित हलमारे, सोमेन्द्रसिंग तूरकर, छगन विठ्ठले, राकेश इंदूरकर, सुनील डहाके, संतोष केदार, घनश्याम कुंभलवार यांनी केली.

# दुग्धव्यवसायात गुणवत्ता आणि मूल्यवर्धन महत्त्वाचे- जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर

**अर्जुनी मोरगाव:-** जिल्हा परिषद गोंदिया यांच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या व पंचायत समिती अर्जुनी मोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने इंजोरी येथे भव्य तालुकास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास शेतकरी, पशुपालक, महिला बचतगट सदस्य तसेच ग्रामीण भागातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले, दिपाताई चंद्रिकापुरे सभापती पशु व कृषी, पोर्णिमा ढेंगे सभापती महिला व बालकल्याण, डॉ. लक्ष्मण भगत सभापती अर्थ व बांधकाम, आम्रपाली डोंगरवार पं.स. सभापती, संदीप कापगते उपसभापती, जि.प. सदस्य यशवंत गणविर, जयश्री देशमुख,शैलजा सोनव-ाने माजी सभापती तथा पं.स. सदस्य,होमराज पुस्तोडे,कुरुंदा वैद्य सरपंच इंजोरी, सचिन डोंगरे , विलास फुंडे, काशिनाथ कापसे, लोकपाल गहाणे,डॉ. जे. के. टिटमे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, डॉ. गुणवंत फडके सहाय्यक आयुक्त, डॉ. संदीप चौधरी, पल्लवी वाडेकर गटविकास अधिकारी, ए. सी. राणे सहाय्यक गटविकास अधिकारी,डॉ. एस. बी. वाघाये पशुधन विकास अधिकारी, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि गोपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




प्रदर्शनामध्ये विविध जातींच्या गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या तसेच कुक्कुटपालनातील उत्कृष्ट नमुने सादर करण्यात आले. आधुनिक पशुपालन पद्धती, दुग्धव्यवसायातील नवतंत्रज्ञान, पशू आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण, संतुलित आहार आणि शासकीय योजना व अनुदान याविषयी तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पशुपालकांच्या शंका-समाधानासाठी विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात गोमातेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पशुपालन हा केवळ पारंपरिक व्यवसाय नसून आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक पद्धती आणि योग्य नियोजनाच्या सहाय्याने तो अत्यंत लाभदायक व टिकाऊ उद्योग ठरू शकतो,असे प्रतिपादन केले.

पशुपालकांनी सुधारित वाणांच्या जनावरांची निवड, संतुलित व पोषक आहार व्यवस्थापन, वेळेवर लसीकरण आणि नियमित आरोग्य तपासणी यांना प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

# कान्होलीतील महिलांचा मद्यविक्री केंद्राला तीव्र विरोध;जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अर्जुनी मोरगाव :-** ग्रामपंचायत कान्होली अंतर्गत धाबे टेकडी परिसरात नव्याने मंजूर करण्यात आलेल्या बिअर बार / मद्यविक्री परवान्याविरोधात कानोली व परिसरातील महिलांनी एकमुखी आवाज उठवित आज गोंदिया येथील जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. सदर परवाना तात्काळ रद्द करून दुकान सुरू होण्यापासून थांबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

महिलांच्या निवेदनानुसार, धाबे टेकडी, जब्बारखेडा व सोनार कान्होली परिसरात मद्यविक्री केंद्रास मंजुरी देण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संबंधित दुकान अद्याप सुरू झाले नसले तरी लवकरच सुरू करण्याची तयारी सुरू असल्याचे समजताच महिलांनी संघटित पवित्रा घेत प्रशासनाकडे धाव घेतली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण भागात मद्यविक्रीमुळे घरगुती अत्याचार, कुटुंबातील वाद, आर्थिक उत्पन्नाची नासाडी, मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याची भीती आहे. शासनाच्या दारूबंदी व व्यसनमुक्ती धोरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामसभेचा ठराव व महिलांचा विरोध विचारात घेणे आवश्यक असल्याचे महिलांनी स्पष्ट केले.

या संदर्भात ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद असून त्याची प्रत प्रशासनास सादर करण्यात आली आहे. संबंधित परवाना रद्द न केल्यास महिलांकडून लोकशाही मार्गाने आंदोलन, मोर्चा व उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.दरम्यान, जिल्हा प्रशासनाने सदर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी कान्होली व परिसरातील महिला ग्रामस्थांनी केली आहे.निवेदन देतेवेळी छाया अमले, हेमलता गावळ,विरेखा वल्के, कल्पना राखडे, कविता कोरेटी, शालिनी वाढई, अनिता राहिले, अंजली पुराम, वर्षा कुंभरे, मीनाक्षी अमले, यशोदा गोटे, सुनीता रहिले, मंदा उरकुडे व अन्य महिला प्रामुख्याने उपस्थित होत्या.

# सायबर गुन्ह्याच्या वाढत्या धोक्याचा दैनिक जीवनावर परिणाम: अप्पर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला

**गोंदिया :-** सायबर गुन्ह्याच्या वाढत्या धोक्याचा परिणाम दैनिक जीवनावर येऊन ठेपला आहे, यासाठी सायबर जागरूकता होणे फार महत्त्वाचे असल्यानेच आजचा सुरक्षित आंतरजाल दिवस म्हणजेच ङ्गसेफ इंटरनेट डेफ साजरा करण्यात येत असल्याचे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला यांनी येथे केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात सेफ इंटरनेट डे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते, याप्रसंगी उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, सायबर सेलचे पोलीस उपनिरिक्षक राजेश शेंद्रे, शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाचे मनोज बल्लाळ, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अभिनय बोरतरकर, महसुल अधिक्षक धनंजय देशमुख मंचावर उपस्थित होते.

श्री. मुल्ला पुढे म्हणाले, मोबाईलच्या अतीवापरामुळे वाढत्या शारीरिक, मानसिक, आर्थिक दुष्परिणाम वाढत आहेत. बऱ्याचदा आपणच इनपुट्स देतो, त्या माहितीतून सायबर क्राईम वाढत चाललेले आहे. मोबाईल वापरताना काळजीपूर्वक वापरावा. लहान बालकांच्या हाती मोबाईल देऊ नये, याची काळजी पालकांनी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक घर-ातून सायबर गुन्हा होणार नाही यासंदर्भाच्या सुरक्षिततेची जबाबदारी घरच्या प्रमुखांनी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

साधा मोबाईल ते टू जी, थ्री जी आणि आता फाइव जी पर्यंतचा प्रवास आपण पाहिलेला आहे. यात झालेला बदल आणि अद्यावत झालेले तंत्रज्ञान त्यामुळे सोय झाली तर कुठे कुठे डिजिटल गुन्हे वाढत चाललेले आहे. याबाबत काही सिनेमा तसेच वेब सिरीज मधून जागरूकता पसरवली जात आहे, त्या देखील आपण सर्वांनी बघायला हव्यात असे श्रीमती पाटील यांनी सांगितले.

**भीती आणि लोभ हे सायबर गुन्ह्याचे मुख्य कारणे : पोलीस निरीक्षक शेंद्रे**

भीती आणि लोभ हे सायबर गुन्ह्याचे मुख्य कारणे असल्याची माहिती सायबर पोलीस निरीक्षक श्री. शेंद्रे यांनी सांगितले. ऑडिओ व्हिडिओ आणि मेसेज या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हे होत असतात. या गुन्ह्यांना शिक्षित वर्गही मोठ्या प्रमाणात बळी पळत असल्याचे संशोधन आहे. सायबर गुन्ह्यात अडकल्यानंतर घडलेल्या घटनेच्या तासाभरातच (गोल्डन आर) मध्ये गुन्हा दाखल झाला तर सायबर गुन्ह्या अंतर्गत झालेली फसवणूक टाळता येते. सायबर गुन्हा झाल्यास १३९० या क्रमांकावर फोन करून गुन्हा लगेच नोंदवावा.

एपीके फाईल या फसवणुकीच्या फाइल्स असतात. मोबाईलवर सारखे जाहिरातीचे मेसेजच्या माध्यमातून ते येत असतात. एकदा अशा लिंकवर क्लिक केले तर आपण सायबर गुन्ह्यात ओळखतो. त्यामुळे अशा फाईल्सवर क्लिक करणे टाळायचे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

कुठल्याही भूलथापांना बळी पळून शिघ्र श्रीमंत होण्याचा मार्ग टाळण्यातच भलाई असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आजच्या काळात सायबर गुन्हेगार हे स्लीपर सेल्स म्हणून काम करतात. त्यामुळे अतिशय जागरूकपणे सोशल मीडिया व अन्य माध्यमे वापरणे गरजेचे असल्याचेही ते यावेळी म्हणाले. गुन्हेगार हा प्रादेशिक भाषेत बोलत नसून तो हिंदी अथवा इंग्रजी भाषा जाणतो, अशावेळी त्याच्याशी मातृभाषेतून बोलून सायबर गुन्हा टाळता येतो असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला.

**आजच्या युगात सायबर गुन्ह्यापासून बचाव करणे मोठे आव्हान आहे : प्राध्यापक बल्लाळ**

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे, त्यामुळे सायबर गुन्ह्यापासून बचाव करणे हे मोठे आवाहन असल्याचे प्राध्यापक बल्लाळ यांनी सांगितले. त्यांनी ट्रू कॉलर हे अॅप मोबाईल वरून काढून टाकण्यास सांगितले, कारण या अॅपच्या माध्यमातून आपण आ-पली सर्वच माहिती देत असल्याचे निदर्शनास आले. क्रोम आणि व्हाट्सअपमधल्या काही सेटिंग्स बदलून माहिती प्रधानापासून बचाव होऊ शकतो असे सांगितले. आज मोबाईलच्या माध्यमातून मिळालेली माहिती विकून आपल्या व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आलेली आहे. त्यामुळे अॅप वापरताना केवळ त्यात साठीच्या परवानगीवर क्लिक करावे अशी माहिती दिली. पासवर्ड ठेवताना हाय पण स्पेशल कॅरेक्टर्स असावे याची दक्षता घ्यावी आणि रियल टाईम ओटीपी तसेच टू वे ऑथेंटीफिकेशन असावे असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार एन.आय.सी.चे नेटवर्क अभियंता किशोर बगमारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा प्रकल्प अधिकारी हरिचंद्र पौनिकर, एन.आय.सी. चे अभियंता भानू हरिणखेडे यांनी प्रयत्न केले.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार -२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**भंडारा-:**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा,उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घ्यावयाचे आहेत.अर्जाचे नमुने dgpir.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.


**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर,(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया**

ई-मेल eegidvngondia@gmail.com दुरध्वनी क्र.०७१८२-२३७०७७

**ई-निविदा सुचना क्र.१९/गोपावि/२०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया ता. जि.गोंदिया ह्यांचे (दुरध्वनी क. ०७१८२-२३७०७७) खालील कामाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत पंजीबद्ध असलेल्या खुल्या प्रवर्गाअंतर्गत जिल्हा गोंदिया निविदा कडून ब-१ नमुन्यातील (टक्केवारी दराने) मोहोरबंद निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा विक्री तसेच मोहरबंद निविदा स्विकारण्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे. तसेच संपूर्ण निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रु. | इसारा बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग/पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | Emergency Work of Construction of Irrgation Canal Crossing on Khairbanda Feeder Canal @4900 M.of Bahnpur Ex. Mal.Tank | रू.३,६६,२४८/- (जीएसटीसह) | रु.३,७ ००/- | रु.१,१८०/- | वर्ग ९ व त्यावरील | ०६ महिने |
| २. | पाटबंधारे उपविभाग नवेगावबांध अंतर्गत वाहन क्र.एम.एच ३५-डी ३०८ करिता कंत्राटीतत्वार चालक व शिपाई पुरविण्याचे काम | रु.१,४४.३८७/- | रू.१,५००/- (जीएसटीसह) | रू.१,१८०/- | वर्ग ९ व त्यावरील | ११ महिने |

अ) निविदा विक्री कालावधी :-२०.०२.२०२६ ते दि.२७.०२.२०२६ (सकाळी १०.०० ते सायं.१७.४५ वाजे पर्यंत, ब) निविदा सादर करण्याचा शेवट चा दिनांक :- २५.०३.२०२६ वेळ १४ वाजेपर्यंत, क) निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.०५.०३.२०२६ वेळ १६.०० वाजेपासून (शक्य झाल्यास)१) कोऱ्या निविदा प्रपत्राची रक्कम रोखीने स्विकारण्यात येईल. २) निविदेचा देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १०%पर्यंत कमी कराच्या असल्यास निविदि किंमतीच्या १०% परंतु कमीत कमी १०००/- उदा. ३ ते १०%कमी दराकरिता १% Performance Security डी.डी. उघडल्यानंतर प्रथम नमुन्तम देकार सादर करणाऱ्या (L1) निविदाकाराने (२) दोन कामाजाच्या दिवसांत विभागीय कार्यालयात जमा करावा.३) भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचे कार्यालयास दिनांक ०५.०३.२०२६ सायंकाळी १४.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील व ०५०३.२०२६ रोजी दुपारी १६.०० वाजे पासुन (शक्य झाल्यास) उपलब्ध असल्यास निविदाकाराचे समक्ष क्वि त्यांचे प्रतिनिधी समक्ष निविदा उघडण्यात येतील. ४) कोणतीही निविदा नाकारण्याचा अथवा रद् करण्याचा अधिकार समक्ष अधिकाऱ्यांने राखून ठेवला आहे.

**स्वा./**
**कार्यकारी अभियंता**
**गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया**

जिमाका/गों/जाहि/१४२/२०२६

# दोन कोटींचा बोनस घोटाळा

## गोंदिया जिल्ह्यातील १३पैकी दोन संस्थांवर गुन्हा, ८०० शेतकरी लाभापासून वंचित

**गोंदिया:-** सालेकसा तालुक्यातील मूळ १,४४७ शेतकऱ्यांना वगळून भूमिहिनांच्या नावावर बोनसची रक्कम काढून सुमारे दोन कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीत १३ संस्थांमध्ये बोनसच्या रकमेची अफरातफर झाल्याचे स्पष्ट झाले. मात्र दोन संस्थांनी रक्कम परत न केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. इतर ११ संस्थांवर कारवाई करण्यात आली नाही. मात्र सुमारे ८०० शेतकऱ्यांच्या नावावरील जमीन रद्द (कॅन्सल लँड) दाखवून दुसऱ्या नावे ऑनलाइन केल्यामुळे हे शेतकरी बोनसपासून वंचित राहणार आहेत. बोनसच्या लाभासाठी हे शेतकरी आता जिल्हा पणन अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवित आहेत.



धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान स्वरुपात बोनस दिले जाते. २०२४-२५च्या रब्बी हंगामासाठी सरकारकडून बोनस जाहीर करण्यात आला. बोनस देय असलेल्या शेतकऱ्यांची नावे ॲपच्या माध्यमातून पणन विभागाकडून मागविण्यात आले. मात्र शेती नसलेल्यांच्या नावावर जमीन दाखवित त्यांची नावे समाविष्ट करण्यात आली. त्यांच्याकडून धान खरेदी केल्याचेही नमूद करण्यात आले. या घोटाळ्याने पात्र शेतकरी बोनसपासून वंचित राहिले. या प्रकाराची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आल्यानंतर त्यांनी चौकशीचे आदेश दिले. चौकशीत १३हून अधिक संस्था घोटाळ्यात सहभागी असल्याचे समोर आले. घोटाळ्याची रक्कम संस्थांकडून वसूल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. दोन संस्थांनी पैसे परत न केल्यामुळे त्या संस्थांच्या २८ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. इतर संस्थांवर कारवाई न करण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, नगर परिषद, महसूल, गोंदिया शिक्षण संस्था व वनविभागाच्या जमिनीचे सात-बारा वापरून बोनस लाटण्यात आल्याचे चौकशीत पुढे आले आहे.

### घोटाळेबाजांची साखळी सक्रिय

**शासनस्तरावर दोन प्रमुख अभिकर्ता संस्थांच्या नियंत्रणाखाली सब एजंट (संस्था)च्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी केली जाते. भीम ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांची इत्यंभूत माहिती अपलोड केली जाते. या माहितीची खातरजमा करणे जिल्हा पणन अधिकारी कार्यालयाचे काम आहे. सालेकसा तालुक्यात या कार्यालयाने घोटाळेबाजांना अभय दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. हा घोटाळा केवळ सालेकसा तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात झालेला आहे. चौकशी करण्यात आल्यास घोटाळ्याची सत्यता समोर येणार असल्याचा दावाही शेतकऱ्यांनी केला आहे.**

### पणन कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

**सालेकसा तालुक्यात १३ संस्थांच्या माध्यमातून कोट्यवधीचा बोनस घोटाळा करण्यात आला आहे. याबाबतच्या पुराव्यानिशी जिल्हाधिकारी व पणन अधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात आली. चौकशीतही ही बाब निश्चित झाली. मात्र दोन संस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आला. तर उर्वरित ११ संस्थांना अभय देण्यात आले आहे. या संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, वंचित असलेल्या शेतकऱ्यांना बोनसची रक्कम अदा करण्यात यावी, अशी मागणी दरबडाचे सरपंच तामिल टेंभरे व शेतकऱ्यांनी केली आहे. १५ दिवसांच्या आत बोनस देण्यात न आल्यास जिल्हा पणन अधिकारी कार्यालयासमोर फटाके फोडो आंदोलन व बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे.चुर्का?यांपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांमध्ये फुलनबाई कटरे, मेघराज नारायण चौधरी, अमृतलाल परसराम नवगोडे, अशोक छंदु सोनवणे, अडकुदास माहुले, मोतीलाल दमाहे, धन्वंती जीवन रक्षे, जीवनराम रक्षे, हसनलाल मच्छिरके, तुलसीदास माहुले, रामेश्वर माहुले, महेशकुमार लिल्हारे, नितेश लिल्हारे, पवन लिल्हारे, गणू दमाहे, सुखावती लिल्हारे, यशोदा माहुले, अनिल फुलहारे आदी शेतकऱ्यांचा समावेश आहे.**

सालेकसा तालुक्यात २०२४-२५मध्ये पणन हंगामात प्रोत्साहन राशीमध्ये अनियमिततेत समाविष्ट असलेल्या सर्व दोषी संस्थावर कारवाई करून शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उपसचिव प्रमोद पाटील यांनी २१ जानेवारी २०२६ रोजी दिले आहेत.

### दक्षता पथकांची नियुक्ती

**गोंदिया जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावरील संस्थांच्या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी २१ जानेवारी रोजी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दक्षता पथकाची नियुक्ती केली आहे. या नियुक्ती पथकाने आपल्या तपास कार्याला सुरवात केली आहे. या तपासणी पथकामध्ये गोंदिया तालुक्यातील संस्थांच्या तपासणीकरिता नागपूर, तिरोडा तालुक्यासाठी गडचिरोली, गोरेगावकरिता भंडारा, आमगावकरिता चंद्रपूर, सालेकसासाठी वर्धा, सडक-अर्जुनीसाठी वाशीम तर देवरी तालुक्यासाठी अकोला जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. या दक्षता पथकाने चौकशीला सुरुवात केली आहे. या समितीच्या अहवालानंतर सालेकसा तालुक्यातील उर्वरित व इतर तालुक्यांतील संस्थांवर कारवाईची शक्यता वर्तविली जात आहे.**

# जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यात निधी वाढवून मिळावा

## राज्यस्तरीय बैठकीत पालकमंत्र्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**गोंदिया :-** जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, ऊर्जा व अपारंपारिक ऊर्जा विकास आणि महिला व बालविकास विभागांच्या मूलभूत बाबींसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात गोंदिया जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यात यासाठी वाढ करून द्यावी, अशी मागणी गोंदिया जिल्ह्याकडून करण्यात आली.

मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेचा अंतिम आराखडा करण्यासंदर्भात मुंबई येथे राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीस उपस्थित होते. त्यावेळी मागणी केली. गोंदिया येथून जिल्हाधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगनांथम, जिल्हा नियोजन अधिकारी श्री मुरलीनाथ वाडेकर उपस्थित होते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हाला २९८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. यावर्षी या निधीत विकासकामांसाठी वाढ होणे अपेक्षित आहे.

सामान्य शिक्षण विभागासाठी वर्ग



खोल्यांची दुरुस्ती, नवीन वर्गखोली, बांधकाम, रंगरंगोटी, टेबल व खुर्च्या, शौचालय, सार्वजनिक आरोग्य अंतर्गत येणारे प्राथमिक आरोग्य केंद्र, ओपीडी, अधिष्ठाता यंत्रणा, जिल्हा आरोग्य यंत्रणा आणि शल्यचिकित्स यंत्रणे अंतर्गत येणाऱ्या आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. महिला व बालकल्याण अंतर्गत इमारतींची दुरुस्ती नवीन इमारतींचे बांधकाम यासारख्या पायाभूत बाबींसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

यासह ऊर्जा व अपारंपारिक ऊर्जा विकास, वने, व्यवसाय शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, नगर विकास, ऊर्जा विकास, परिवहन, पर्यटन विकास, एकात्मिक ग्रामीण विकास, तंत्र शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, मागासवर्गीय कल्याण, लघुपाटबंधारे, गतिमान प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन, गृह पोलीस, या विभागांना अद्यावत करण्यासाठी एकूण २९५ कोटींच्या अतिरिक्त निधीची आवश्यकता असून हा निधी जिल्ह्यास मिळाल्यास जिल्ह्यातील नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध होतील, यासाठी हा निधी जिल्ह्याला मिळावा अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.

राज्य वित्तमंत्री आशिष जयस्वाल यांनी यापूर्वी गोंदिया जिल्ह्यात गोंडी चित्रकला आणि संस्कृती लोकांपुढे यावी यासाठी प्रचार प्रसिद्धीच्या माध्यमातून साईन बोर्ड मोक्याच्या ठिकाणी लावलेले होते, ही मोहीम चांगली ठरली असून पुन्हा यासारखे अभिनव उपक्रम राबवावे, अशी सूचना त्यांनी बैठकीत केली.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून आराखड्याचे सादरीकरण

जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी शासनाने सुचविलेला नियतव्यय आणि विभागांकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या पुढील आर्थिक वर्षाच्या आराखड्याचे सादरीकरण केले. यावर्षी झालेला खर्च व पुढील वर्षी आवश्यक निधीची माहिती त्यांनी सादर केली.

# तब्बल ३० वर्षांपासून न.प. दुकान गाळे भाडे पुनर्रचनाच नाही



**गोंदिया :-** नगर परिषदेला जे विविध स्रोतांच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त होते, त्यापैकी एक महत्त्वाचा स्रोत म्हणजे दुकानगाळे होत. शहरात न.प.च्या मालकीचे ११०० वर दुकानगाळे आहेत. या माध्यमातून सध्या नगर परिषदेला वर्षाकाठी ३ कोटी २७ लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त होते. मात्र तब्बल ३० वर्षांपासून दुकानगाळ्यांची भाडेवाढ व त्यांची पुनर्रचना झाली नाही. त्यामुळे फारच कमी भाडे संबंधित गाळेधारक देत आहे. त्यामुळे नगर परिषदेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची धक्कादायक बाब पुढे आली.

शहरातील इंदिरा गांधी स्टेडियम, नगर परिषद परिसर, गंर्ज बाजार परिसर तसेच शहरातील इतर मोक्याची ठिकाणी नगर परिषदेने दुकान गाळे तयार करुन ते भाड्याने दिले आहे. नगर परिषदेच्या बाजार विभागाने दिलेल्या माहितीनुसार त्यांची जवळपास ११०० दुकान गाळे यात आहे. यापैकी बहुतांश दुकाने हे ३० वर्षापूर्वीपासून भाडेतत्त्वावर दिली आहे. तेव्हा भाडे हे ३०० ते ४०० रुपये आहे. त्यात गेल्या ३० वर्षात वाढ करण्यात आली नाही. नगर परिषद अधिनियम १९८३ नुसार त्यात दर चार वर्षांनी भाडेवाढ व कर पुनर्रचना करणे आवश्यक आहे. पण ती अद्यापही करण्यात आली नाही.

बाजार विभाग, मालमत्ता कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा याकडे लक्ष दिले नाही. परिणामी दरवर्षी नगर परिषदेचे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न बुडत आहे. सध्या नगर परिषदेला १०७७गाळ्यांच्या माध्यमातून वर्षाकाठी ३ कोटी २७लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. जे १० ते १५ कोटी रुपये मिळायला हवे होते. पण नगर परिषदेच्या काम चुकार कारभारामुळे कोट्यवधीचा महसूल बुडत आहे.

### तीन सदस्यी समिती स्थापन करणार

**गोंदिया नगर परिषदेत नवीन पदाधिकारी सत्तारुढ झाले असून त्यांनी याची गांभीर्याने दखल घेत कार्यवाही करण्यास सुरुवात केली आहे. नगराध्यक्ष सचिन शेंडे यांनी गुरुवारी (दि. ५) नगर परिषदेत बैठक घेऊन थकीत दुकान भाडे, भाडेवाढ, मालमत्ता कर पुनर्रचना, तसेच दुकान गाळे खाली करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबवून गाळ्यांचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या सर्व प्रक्रियेसाठी तीन अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्याची तयारी केली आहे**

# हॉटेलात बिलावर 'सर्व्हिस चार्ज' आकारल्यास तक्रार कुठे कराल?

## तक्रार करा अनब धडा शिकवा : हॉटेलातील सेवा शुल्क पूर्णपणे ऐच्छिक

गोंदिया : वीकेंड किंवा सुट्टीच्या दिवशी आपण कुटुंब किंवा मित्रांसोबत बाहेर जेवण्याचा प्लॅन करता. अनेक रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्स सुद्धा तुमच्या खाण्याच्या (फूड) बिलामध्ये सर्व्हिस चार्ज जोडतात. तुमच्यासोबतही असे घडत असेल, तर त्याचा निषेध करा.

ग्राहक कायदा ग्राहकांना सेवा शुल्काविरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार देतो. सेवा शुल्काबाबत हॉटेल्स-रेस्टॉरंट आणि ग्राहकांमध्ये वाद झाल्याचे गेल्या काही वर्षांत पाहायला मिळाले आहे. तुम्ही तुमचे कुटुंब किंवा मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जाता आणि जेवण झाल्यावर मालक तुमच्या फूड बिलात सर्व्हिस चार्ज (सेवा शुल्क) जोडतात. अशा परिस्थितीत, ग्राहकाला त्याचे पैसे वाचवण्याचे काही अधिकार असतात. हॉटेलवाले अनेकदा सर्व्हिस चार्जच्या नावाखाली जास्त पैसे आकारतात, जे नियमानुसार पूर्णपणे चुकीचे आहे. तुमच्या सोबतही असा काही प्रकार घडला असेल किंवा भविष्यात तुमच्यासोबत असे घडू नये, यासाठी ग्राहक चार प्रकारे तक्रार करू शकतात.

### इतर नावाने किंवा छुप्या शुल्कावरही बंदी

ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना बिलामध्ये मसर्व्हिस चार्जफ (सेवा शुल्क) स्वयंचलितपणे लावण्यास, इतर नावांनी लपवून शुल्क आकारण्यास किंवा ग्राहकांना ते भरण्यास भाग पाडण्यास सक्त मनाई केली आहे. हे शुल्क पूर्णपणे ऐच्छिक असून, ते न भरल्यास सेवा नाकारता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश आहेत आणि या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे. यात दंड आणि शुल्क परत करण्याच्या सक्तीचा समावेश आहे.

### ग्राहक संरक्षण कायदा काय म्हणतो?

ग्राहकांचे हित लक्षात घेऊन सीसीपीएने ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम १८(२) (आय) मध्ये मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार जर एखाद्या रेस्टॉरंट किंवा हॉटेलने ग्राहकांकडून संमतीशिवाय अतिरिक्त कर किंवा शुल्क आकारले तर ते पूर्णपणे बेकायदेशीर असेल आणि त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

### मार्गदर्शक तत्त्वात काय नमूद ?

ग्राहकांच्या मान्यतेशिवाय हॉटेल किंवा रेस्टॉरंट सेवा शुल्क आकारू शकत नाहीत. मात्र, या निर्णयानंतरही अनेक ठिकाणच्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्सनी ग्राहकांकडून सेवा शुल्क आकारणे सुरूच ठेवले, तर त्यांच्यावर कारवाई केली जाऊ शकते.

### सेवा शुल्क ऐच्छिक, ग्राहकावर दबाव आणू नका

सेंट्रल कन्झ्युमर प्रोटेक्शन अथॉरिटी (सीसीपीए) ने एका महत्त्वपूर्ण निर्णयात हॉटेल आणि रेस्टॉरंट्स फूड बिलात सर्व्हिस चार्ज आकारू शकत नाहीत, असा निर्णय दिला होता. तसेच, ग्राहकांची इच्छा असल्यास तो स्वतः सेवा शुल्क भरू शकतो असं म्हटले आहे. त्यासाठी सेवा शुल्क संदर्भात ग्राहकांवर दबाव आणू शकत नाही.

### बिलात सर्व्हिस चार्ज आकारण्यास बंदी

सर्व्हिस चार्जबाबत ग्राहक चार प्रकारे तक्रार करू शकतात. सेवा शुल्क रेस्टॉरंटमध्ये जेवणाच्या बिलामध्ये समाविष्ट केले जाऊ शकत नाही. ग्राहकाची इच्छा असल्यास तो स्वतः सेवा शुल्क भरू शकतो.

### कारवाई आणि दंडाची काय तरतूद ?

नियमांचे उल्लंघन केल्यास, ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई होऊ शकते. ज्यामध्ये हॉटेलला दंड भरावा लागू शकतो आणि ग्राहकांना पैसे परत मिळवून दिले जाऊ शकतात.

### कुठे करता येईल याबाबत तक्रार

रेस्टॉरंट किंवा हॉटेल मालक-व्यवस्थापक तुमचे ऐकत नसल्यास तुम्ही नॅशनल कन्झ्युमर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवू शकता. येथे सुरुवातीलाच वाद मिटवण्याची व्यवस्था असून, तुम्ही हेल्पलाइन नंबर १९१५ वर कॉल करून किंवा एनसीएच ॲपद्वारे तक्रार नोंदवू शकता. याशिवाय ग्राहक याबाबत कन्झ्युमर आयोगाकडे तक्रारही करू शकतो. ई-फायलिंग पोर्टलवरही ऑनलाइन तक्रार करता येते.

### तक्रार करण्याआधी बिल, पावत्या जपून ठेवा

ग्राहकांच्या मान्यतेशिवाय हॉटेल किंवा रेस्टॉरंट सेवा शुल्क आकारू शकत नाहीत. मात्र, या निर्णयानंतरही अनेक ठिकाणच्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्सनी ग्राहकांकडून सेवा शुल्क आकारले तर तक्रार करण्याआधी बिल व पावत्या जपून ठेवाव्यात.

# पाचव्या वर्गातील विद्यार्थ्याला शिक्षिकेकडून बेदम मारहाण

## गोरठा येथील जि.प.शाळेतील प्रकार-शिक्षिकेच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल

**गोंदिया:-**कोणतेही कारण नसताना शाळेच्या पटांगणात खेळत असलेल्या पाचव्या वर्गातील विद्यार्थ्याला शाळेतील शिक्षिकेने वर्गखोलीत नेऊन बेदम मारहाण करून जखमी केले. ही घटना आमगाव तालुक्यातील गोरठा येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी १० फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी काल बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांच्या आईच्या तक्रारीवरून आमगाव पोलिसात सदर शिक्षिकेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



धैर्य मनोज मिश्रा (१२) रा. गोरठा असे त्या मारहाणीत जखमी झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. धैर्याच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार धैर्य हा आपल्या मित्रासोबत शाळेच्या ग्राउंडमध्ये खेळत असताना त्याने सहपाठी मित्राला मलॉलीपॉपफ मागितले. यावेळी शेजारून जात असलेल्या संबंधित शिक्षिकेने हे ऐकून धैर्यला सहाव्या वर्गात नेत त्याला कोणतेही कारण नसताना हाताबुक्क्यांनी तसेच बासाच्या काठीने पाठीवर छातीवर व हातावर बेदम मारहाण केली. यामुळे धैर्यच्या अंगावर मारण्याचे व्रण येऊन तो जखमी झाला.घटनेनंतर वर्गमित्रांनी धैर्यला घरी आणून सोडले. दरम्यान धैर्यची आई रानी मनोज मिश्रा (३२) ह्या सायंकाळी शेतातून घरी आल्यावर त्याचा लहान भाऊ इयान मिश्रा याने शाळेत घडलेला प्रकार आईला सांगितला. यावेळी त्याच्या आईने पाहणी केली असता त्यांना धैर्यच्या पाठीवर व्रण उमटलेले दिसून आले. यावर त्यांनी बुधवारी दुपारी आमगाव पोलिस ठाणे गाठून संबंधित शिक्षकेविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे आमगाव पोलिसांनी शिक्षिकेच्या विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

### असंघटीत कामगारांसाठी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना नोंदणी करण्याचे आवाहन

**गोंदिया:** सर्व असंघटीत कामगारांनी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेअंतर्गत नोंदणी करण्याचे आवाहन,सहायक कामगार आयुक्त, गोंदिया मार्फत करण्यात आले आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व असंघटित पुरुष किंवा स्त्री कामगार नोंदणी करु शकतात. नोंदणीसाठी पात्रता : वय १८ ते ४० वयोगट. मासिक उत्पन्न १५ हजार रुपये पेक्षा कमी. आयकर भरणारा नसावा. एझऋज व एडखउ अथवा राष्ट्रीय पेंशन योजनेचा सदस्य नसावा. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे : आधारकार्ड, आधारकार्डशी लिंक असलेले मोबाईल नंबर, राष्ट्रीयकृत बँक पासबुक.

नोंदणीचे लाभ : जर कोणत्याही असंघटित कामगाराने या योजनेचे सदस्यत्व घेतले असेल आणि त्याने वयाच्या ६० व्या वर्षापर्यंत नियमित योगदान दिले असेल, तर त्याला किमान मासिक ३ हजार रुपये पेंशन मिळेल. त्याच्या/तिच्या मृत्यूनंतर पती/पत्नीला मासिक कुटुंब पेंशन मिळेल जे पेंशनच्या ५० % राहील. लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वैवाहीक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार. लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

# शहरातील अनधिकृत बांधकामांना परवानगी नेमकी दिली कुणी?

**गोंदिया :-** शहरातील अतिक्रमणांच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यातच अनेकांनी नाल्यांवर पक्के बांधकाम केले आहे. ६० फुटांचा रस्ता ३० फुटांचा झाला आहे. तर काहींनी रस्त्यापर्यंत बांधकाम केले आहे. शहरातील प्रभाग क्रमांक ५ परिसरातील समस्यांची पाहणी करताना गुरुवारी (दि.५) हा प्रकार उघडकीस आला.नगराध्यक्ष सचिन शेंडे यांनी या अनधिकृत बांधकामांना नेमकी परवानगी दिली कुणी? याचा शोध घेण्यासाठी नगररचना व बांधकाम विभागाला याच्या फाइल्स सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



### अतिक्रमणांवर चालणार आता बुलडोझर

**शहरातील सर्वच भागात अनेकांनी नाल्यांवर आणि रस्त्यापर्यंत अतिक्रमण केले आहे. यामुळे सांडपाण्याचा निचरा होण्यास अडचण होत आहे. अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडीत वाढ झाली आहे. त्यामुळे या अनधिकृत बांधकामावर नगरपरिषद लवकर अतिक्रमण हटाव मोहीम राबवून बुलडोझर चालविणार असल्याचे न.प.च्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.**

> **शहराच्या स्वच्छतेची व विकासाची जबाबदारी ही नगरपरिषदेची आणि पदाधिकारी म्हणून आमची आहे. त्यामुळे शहरवासीयांच्या समस्येची दखल घेऊन यावर त्वरित उपाययोजना करण्यात येतील, अतिक्रमण, केरकचऱ्याची विल्हेवाट आणि सांडपाण्याचा निचरा या समस्या प्राधान्याने मार्गी लावल्या जातील.**
>
> **सचिन शेंडे, नगराध्यक्ष, गोंदिया**

शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील नमाद महाविद्यालयाच्या जवळील परिसरात केरकचऱ्याचे ढिगारे तसेच नाल्या पूर्णपणे तुडुंब भरल्या आहेत. मात्र, त्यांचा अद्यापही उपसा करण्यात आला नसल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तर डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ही बाब येथील नगरसेवकांनी नगराध्यक्ष सचिन शेंडे यांच्या लक्षात आणून देण्यासाठी त्यांना प्रभाग क्रमांक ५ ची पाहणी करण्यासाठी बोलविले. यानंतर नगराध्यक्ष सचिन शेंडे, उपाध्यक्ष संतोष पटले, नगरसेवक पंकज यादव, धर्मेश अग्रवाल, लाखन बहेलिया यांच्यासह नगराध्यक्षांनी या प्रभागाला भेट देऊन पाहणी केली. तेथील बिकट चित्र पाहून

नगराध्यक्षांनी यावर संताप व्यक्त केला. तसेच नाल्यांचा नियमित उपसा, केरकचऱ्याची उचल नियमित का केली जात नाही यावरून संबंधित सफाई कर्मचाऱ्यांना चांगले धारेवर धरले. तर नाल्या आणि रस्त्यापर्यंत करण्यात आलेले अतिक्रमण पाहून या अनधिकृत बांधकामांना परवानगी दिली कुणी? असा सवाल बांधकाम व नगररचना विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केला.

तसेच या बांधकामांना मंजुरी दिलेल्या फाइल्स सादर करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे आता शहरातील अनधिकृत बांधकामांना नेमकी परवानगी दिली कुणी? याचे बिंग फुटणार आहे. यामुळे या दोन्ही विभागांत खळबळ उडाली आहे.

# अनुसूचित जाती घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचणे हेच योजनांचे खरे फलित-अप्पर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला



**गोंदिया :-** अनुसूचित जातीतील घटकांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्ष पात्र नागरिकांपर्यंत पोहोचणे हेच योजनांचे खरे यश असून, समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याचे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला यांनी केले.

नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यावर सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची तीन दिवसीय छायाचित्र प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. या प्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त (सामाजिक न्याय) किशोर भोयर, तहसीलदार समशेर पठाण, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, सहाय्यक शल्य चिकित्सक अधिकारी डॉ. तृप्ती कटरे, जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर, पत्रकार तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. मुल्ला पुढे म्हणाले, सामाजिक समतेचा पाया मजबूत करण्यासाठी राजश्री शाहू महाराज यांनी मोलाचे कार्य केले, तर राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात आरक्षणासारख्या उपाययोजनांद्वारे अनुसूचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा मार्ग खुला केला. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचण्यासाठी अशा प्रदर्शनांचा उपयोग होतो. या योजनांची माहिती आपल्या संपर्कातील लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी सिकलसेल आजाराबाबत माहिती देत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## छायाचित्र प्रदर्शनी व पथनाट्यातून योजनांची प्रभावी जनजागृती

### छायाचित्र प्रदर्शनी मध्ये विविध योजनांचा समावेश

**छायाचित्र प्रदर्शनी मध्ये एकूण ४६ योजना लावण्यात आलेल्या आहेत यामध्ये शासकीय निवासी शाळा, भारत सरकारची मॅट्रिक उत्तर शिष्यवृत्ती, सैनिकी शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, राजश्री छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार, मिनी ट्रॅक्टर योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, कन्यादान योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना अशा विविध योजनांचे प्रदर्शनी दालन आहे.प्रशासकीय इमारतीत विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या नागरिकांनीही त्यांच्यासाठी उपयोगी असणाऱ्या योजनांची माहिती जाणून घेतली. आज या प्रदर्शनास अंगणवाडी सेविकांनी आणि मदतनीस मोठया प्रमाणात भेट दिली. यासह अर्जुनी मोरगावच्या उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे, अर्चना माळवे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी , मीनाक्षी कांबळे कांबळे जिल्हा ग्रंथालय अधिकारी,संजय जोशी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य यांनीही भेट दिली.**

### पथनाट्यातून केली लोकजागृती

**विक्रम फडके यांच्या असर फाउंडेशनच्यावतीने लोककलाकारांनी पथनाट्य सादर करून अनुसूचित जातीतील घटकांसाठीच्या विविध योजनांची माहिती दिली. मनोरंजनातून दिलेल्या या संदेशामुळे उपस्थित नागरिकांना योजनांची माहिती प्रभावीपणे समजली. तसेच येथे ३६० अंश फिरणारा सेल्फी स्टँडही ठेवण्यात आल्या आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना जिल्हा माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी केली, तर सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले.**